आईची ममता आणि प्रेम हीच मुलांची खरी संपत्ती असते.

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार ३० जून २०२५ | अंक १९३० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism International Pvt. Ltd. Since 2007
All Tours घर से घर तक दिल से दिल तक
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# त्रिभाषा सूत्रासाठी आता नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वाखाली समिती, राज्य सरकाराच मोठा निर्णय






राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने त्रिभाषा सूत्र लागू करण्याबाबतचे दोन्ही निर्णय रद्द केले आहेत. त्यानंतर आता डॉक्टर नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. समितीचा अहवाल आल्यावर त्रीभाषा सुत्र लागू होणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. राज्यात हिंदी भाषेच्या सक्तीवरून वातावरण चांगलंच तापलं होतं. पहिलीपासून हिंदीची सक्ती नको अशी भूमिका राज्यातील अनेक पक्ष आणि संघटनांची होती. त्यामुळे राज्य सरकारवर दबाव वाढत होता. येत्या 5 जुलै रोजी याविरोधात भव्य मोर्चाचं आयोजन करण्यात आलं आहे. या मोर्चाला दोन्ही ठाकरे बंधू शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे उपस्थित राहाणार आहेत. आज देखील याविरोधात शिवसेना ठाकरे गटाच्या वतीनं मुंबईतील आझाद मैदान येथे आंदोलन करण्यात आलं, या आंदोलनाला मनसेसह काँग्रेसच्या नेत्यांची देखील उपस्थिती होती. आझाद मैदान येथे शिवसेना ठाकरे गटाकडून हिंदी सक्तीच्या जीआरची होळी करण्यात आली.

## समितीची स्थापना

राज्य सरकारने त्रिभाषा सूत्र लागू करण्याबाबतचे दोन्ही निर्णय रद्द केले आहेत. त्यानंतर आता सरकारने या संदर्भात एक समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. डॉक्टर नरेंद्र जाधव यांच्या नेतृत्वाखाली या समितीची स्थापन करण्यात येणार आहे. समितीचा अहवाल आल्यावर त्रीभाषा सुत्र लागू केलं जाईल, 16 एप्रिल 2025 आणि 17 जून 2025 चे दोन्ही शासन निर्णय रद्द करण्यात आले आहेत, अशा माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली आहे. या पत्रकार परिषदेला उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची देखील उपस्थिती होती.

# आता शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी वीज दिवसा मिळणार - आ.सुरेश धस

## आठ वीज उपकेंद्रासाठी ५ आणि १० एम.व्ही.ए. चे ट्रान्सफॉर्मर उपलब्ध

आष्टी (प्रतिनिधी) आष्टी मतदार संघात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० अंतर्गत नवीन अतिरिक्त ८ सब स्टेशनला ५ व १० एम. व्ही. ए. चे ट्र ांसफार्मर मतदारसंघासाठी उपलब्ध झाले असल्याने यापुढे आता कृषी पंपासाठी शेतकऱ्याला दिवसा वीज पुरवठा होणार असल्याची माहिती आ. सुरेश धस यांनी दिली. याबद्दल मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० अंतर्गत आष्टी मतदार संघातील ८ सबस्टेशनला ५ एम. व्ही. ए. चे अतिरिक्त नवीन ट्रांन्सफारमर मंजूर होऊन ते मतदारसंघात दाखल झाले असून या सबस्टेशनला उच्च दाबाने पुरवठा होणार आहे. पारगाव जोगेश्वरी, शिराळ, टाकळी अमिया, वाहिरा, पिंपळा तसेच शिरूर तालुक्यातील मानूर टाकळी, तिंतरवणी या सबस्टेशनला अतिरिक्त ५ एम. व्ही. ए. चे तर ब्रम्हनाथ येळंब या सबस्टेशनला १० एम. व्ही. ए. चे ट्रांसफार्मर दाखल झाले आहेत. पाटोदा तालुक्यातील सबस्टेशन प्रस्तावित आहेत तेही लवकर मंजूर होतील. त्यासाठी पाठपुरावा चालू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आता दिवसा वीजपुरवठा होणार असून शेतकऱ्याचा रात्री अपरात्री शेतात जाण्याची गरज राहणार नाही. त्यामुळे होणारे नैसर्गिक अपघात कमी होणार आहेत. विद्युत रोहित्र जळण्याचे प्रमाण देखील कमी होणार आहे. तसेच उच्च दाबाने पुरवठा होणार असून या योजनेअंतर्गत सोलर प्लांट उभारणार असून यातून सबस्टेशन वीजपुरवठा होणार आहे. काही ठिकाणी सोलर प्लॅन्टचे काम प्रगतीपथावर असून जागा संपादनाचे कामे पूर्ण प्रगतीपथावर आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलेला शब्द पाळला - आमदार सुरेश धस राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांच्या कृषी पंपाला दिवसा पुरवठा करणार. सरकार ने दिलेला शब्द पूर्ण केला.

# पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रातील ३३ युवकांना विषबाधा

आष्टी शहरात एक खाजगी भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र चालवले जाते. या केंद्रात शुक्रवार (दि. २७) रोजी रात्रीच्या जेवणामुळे ३३ युवकांना विषबाधा झाली आहे. या अकॅडमीत आष्टी तालुक्यासह इतर तालुक्यातील शेकडो युवक पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण घेत आहेत. शुक्रवारी रात्री जेवल्यानंतर मध्यरात्री दोनच्या सुमारास विद्यार्थ्यांना जुलाब व उलटी होऊ लागली. सगळ्याच युवकांना त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी आष्टी ग्रामीण रूग्णालयात दाखल केले. यातील २० युवकांना अहिल्यानगर येथे पुढील उपचारासाठी पाठविले आहेत. या घटनेची सखोल माहिती आ. सुरेश धस यांनी घेतली असून सर्वांची आस्थेवाईकपणे चौकशी केली आहे. अधिक माहिती अशी की, आष्टी शहरातील एका खाजगी अकॅडमीमध्ये भरतीपुर्व प्रशिक्षणासाठी अनेक विद्यार्थी आहेत. त्यांना नेहमीप्रमाणे शुक्रवार (दि. २७) रोजी रात्री ९ च्या सुमारास जेवण दिले. यामध्ये हुलग्याची भाजी, भाकरी, भात दिला. परंतु मध्यरात्री दिडच्या सुमारास काही युवकांना जुलाब व उलटीचा त्रास होऊ लागला. हळूहळू सर्वच युवकांना त्रास होऊ लागल्याने त्यांना ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. यातील काही युवकांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना उपचारासाठी अहिल्यानगर येथे पाठविण्यात आले आहे.

# पोलीस हक्क संघर्ष संघटनेचा दुसरा वर्धापन दिवस उत्साहात साजरा

बीड(प्रतिनिधी)–शाह अल्पसंख्याक बहुउद्देशीय सेवासंस्था संचलित पोलीस हक्क संघर्ष संघटनेचा दुसरा वर्धापन दिन मान्यवरांच्या उपस्थितीत संविधान पुस्तक वाटप करुन आणि होतकरु म हिलांना साडीचे वाटप करुन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतामध्ये बोलतांना मान्यवरांनी म्हटले की, पोलीस हक्क संघर्ष संघटनेकडून आतापर्यंत पोलीस भरतीचे पुर्व प्रशिक्षण, स्त्रीयांवरील अन्यायाविरोधात लढा दिला गेला तसेच समुपदेशन करुन समाजातील प्रश्न मि टवण्याचे काम संघटनेने केलेले आहे परंतू आता संघटना विस्तारत असून जबाबदारी वाढत आहे त्यामुळे महिला भगिनींसाठी उपयोगी शिबिर संघटनेने राबवावीत आणि संघटनेने राज्यपातळीवर सर्व ठिकाणी काम करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.कार्यक्रमाला यावेळी अध्यक्ष अब्दुल कदीर, कार्यक्रमाचे सूत्रसंचालक संस्थापक अध्यक्ष झेबा शेख मॅडम, कार्यक्रमाचे उद्धाटक वाहतूक शाखेचे पीएसआय विजय जाधवर, विशेष उपस्थिती राजेंद्र लहानेसर, मुस्तफा खान, बाळासाहेब राखे , नाझिमोद्दीन काझी, वसंत सगळे, सुदाम लाड, बाबुराव बडे, राजश्री देबजे तसेच संभाजीनगर जिल्हा, परभणी जिल्हा, पुणे जिल्हा, बीड जिल्हा, बुलढाणा जिल्हा इथून आलेले सर्व म ान्यवर पदाधिकारी महिला व पुरुष मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

# नगरपालिका आणि वाहतुक शाखेच्या माध्यमातून शहरातील अतिक्रमण धारकांवर कार्यवाही

बीड (प्रतिनिधी) या अगोदर फेब्रुवारी महिन्यात शहरातील मुख्य रस्त्यावर अतिक्रमण केलेल्या दुकानदारांना तसेच हातगाड्यांवाल्यांना सरकारी जागेवर अतिक्रमण केल्यास काय होते याचा एकवेळ दणका दिल्यानंतरही शहरातील व्यापारी काही सुधरण्याचे नाव घेत नसून पुन्हा मुख्यरस्त्यावर हातगाडे, ओटे, पत्र्याचे शेड दिसू लागल्याने काल दि.२८ जून रोजी नगरपालिका आणि वाहतुक शाखेच्या माध्यम ातून शहरातील अतिक्रमण धारकांवर कार्यवाही करण्यात आली.

सार्वजनिक रस्ते हे सरकारची मालम त्ता आहे ही बाब माहिती असतांना व्यार्पायांकडून नियमांचे उल्लंघन करुन बीड शहरातील बस स्टॅण्ड, साठे चौक, डीपी रोड, अंबिका चौक, राजीव गांधी चौक आदी मुख्य रोडवरील दुकानदारांनी रस्त्यावर केलेले अतिक्रमण, गाड्यावाले, टर्पयावाले सर्वांचे अतिक्रमण होवू लागले त्यामुळे नगरपालिका आणि वाहतुक शाखेने अतिक्रमण काढून रस्त्यांना मोकळा श्वास घेवू दिला त्यामुळे बीड शहरातील रस्ते

मोठे वाटू लागले आणि वाहने व नागरिकांना जाण्यासाठी रस्ता सुलभ झाला होता. यावेळी एपीआय सानप साहेब, पीएसआय जाधवर साहेब, राजाभाऊ तांदळे, चिंतामणी शिंदे, अजिनाथ मुंडे, विश्वजीत वाघमारे, सिध्दार्थ गोरे, संतोष हरके, मुन्ना गायकवाड, पवन लाहोट ,सुजीत जाधव, वीकी डागट, शरद खुपशे, राम रोकडे, किरण भिसे व इतर कर्मचारी उपस्थित होते.



# उमाकिरणच्या पवार, खाटोकरला दोन दिवसांची पोलीस कोठडी





बीड:अल्पवयीन विद्यार्थिनीचा शारीरिक आणि मानसिक छळ केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेले विजय पवार आणि प्रा प्रशांत खाटोकर या दोघांना रविवार (दि.२९) रोजी न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे . या दोन्ही आरोपीना न्यायालयात रविवार (दि.२९)रोजी दुपारी दीडच्या सुमारास हजर करण्यात आले. यावेळी तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आरोपीच्या वतीने ऍड बाळासाहेब कोल्हे यांनी बाजू मांडली. यावेळी पोलिसांनी मोबाईल रिकव्हर करण्यासाठी पोलीस कोठडीची मागणी केली. यावेळी न्यायालयाने १ जुलै पर्यंत कोठडी सुनावली.

# शिवसेना वर्धापन दिनानिमित्त ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप!

बीड, प्रतिनिधी– शिवसेनेचा वर्धापन दिन यंदा सामाजिक उपक्रमाने साजरा करत शिवसैनिकांनी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवासात हातभार लावण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिवसेना तालुका प्रमुख संतोष जाधव व सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने काल दि. २७ जून २०२५ रोजी दुपारी १२ वाजताच्या दरम्यान जि.प. शाळा महाजनवाडी, पिंपरणई, कोंबडवस्ती व लिंबागणेश गट या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत वह्या व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना तालुका प्रमुख संतोष जाधव यांनी सांगितले की, ङ्गहिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या संस्कारातून प्रेरणा घेत आम्ही शिवसैनिक समाजसेवेचं कार्य प्रामाणिकपणे पार पाडत आहोत. उपमुख्यमंत्री तथा शिवसेना प्रम ुख सन्माननीय एकनाथजी शिंदे व संसदरत्न खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांची सामान्यांसाठीची तळमळ व महाराष्ट्राच्या हितासाठीची कार्यशैली आम्हाला नेहमीच प्रेरणादायी ठरली आहे. जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी संपूर्ण आयुष्य समाजकार्यात झोकून दिले आहे.

त्यामुळे यावर्षी वर्धापन दिन फलकबाजी न करता समाजोपयोगी कार्य करून साजरा केला आहे. यावेळी शिवसेना जिल्हा संघटक सुनील सुरवसे, संचालक बाजार समिती तथा शिवसेना जिल्हा सह समन्वयक दीपक काळे, उपजिल्हा प्रमुख अमोल जाधव, अभिमन्यू घरत, आनंद पिंगळे, पंकज शेळके, विवेक सवाई यांच्यासह सर्व शिवसैनिक, शिक्षकवृंद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसैनिकांनी शालेय विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन केलेल्या सहकार्याबद्दल शाळेतील शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी बीड जिल्हा शिवसेनेचे आभार मानले.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ३० जून २०२५
https://lokaarambh.com


## संपादकीय

### शुभांशू शुक्ला अवकाश मोहिमेवर

४१ वर्षांपूर्वी त्यांनी जेव्हा अवकाशात झेप घेतली, तेव्हा तिथून भारत कसा दिसतो, हा प्रश्न त्यांना तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी विचारला होता. त्यांनी या प्रश्नाला दिलेले वरील उत्तर हे त्यांच्या अंतराळ मोहिमेइतकेच संस्मरणीय ठरले. चार दशकांनंतर, बुधवारी, शुभांशू शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाच्या दिशेने झेप घेतली ते ंव्हा भारताच्या पहिल्या अंतराळवीराच्या आठवणी जाग्या होणे स्वाभाविकच. या मोहिमेवर जाताना शुक्ला यांनी केलेले विधान राकेश शर्मा यांच्या काव्यमय उत्तरासारखे नसले, तरी ते तितकेच महत्त्वाचे आहे. ङ्गहा प्रवास केवळ आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाच्या दिशेने नाही, तर भारताच्या मानवी अवकाश मोहिमेच्या दिशेनेही आहे,फहे शुक्ला यांचे वक्तव्य भारताच्या भावी अवकाश मोहिमांकडे अंगुलिनिर्देश करणारे आहे. शुक्ला यांची अवकाश झेप ही भारताच्या मानवी अवकाश मोहिमांच्या युगाची सुरुवात म्हणावी लागेल. तब्बल चार दशकांनंतर त्यांच्या रूपाने भारताला दुसरा अंतराळवीर मिळाला असला, तरी यापुढील अंतराळवीरांसाठी आता इतका काळ प्रतीक्षा करण्याची गरज भासणार नाही; कारण येत्या वर्षभरातच ङ्गगगनयानफ ही भारताची पहिलीवहिली अवकाश मोहीम कार्यान्वित होईल. त्या मोहिमेची पूर्वतयारी म्हणजे शुभांशू शुक्ला यांची आत्ताची मोहीम. ङ्गऑक्सिऑम ४फया अमेरिकी मोहिमेत भारताचा सहभाग केवळ शुक्ला यांच्यापुरता मर्यादित नाही, तर अंतराळात भारताकडून प्रयोगही केले जाणार आहेत. भारतीय अवकाश संशोधन संस्थेतर्फे (इस्रो) एकूण सात प्रयोग केले जाणार असल्याने ही मोहीम भारतासाठी महत्त्वाची आहे. अवकाश तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारतीय शास्त्रज्ञांनी आणि तंत्रज्ञांनी आपली क्षमता यापूर्वी अनेकदा सिद्ध केली आहे. उपग्रहांपासून प्रक्षेपकांच्या विकसनापर्यंत आणि चांद्र मोहिमांपासून मंगळयानापर्यंतच्या मोहिमा भारताने यशस्वी करून दाखविल्या आहेत. एकाच वेळी शंभराहून अधिक उपग्रहांचे प्रक्षेपण करण्याचा विक्रमही ङ्गइस्रोफने केला आहे. चंद्राच्या अंधार असलेल्या भागात यशस्वीपणे यान उतरविण्याचा मानही भारताने मिळविला आहे. मानवाला अवकाशात पाठविण्यासाठीची मोहीम राबविण्यासाठी सुरुवातीला २०२२चे उद्दिष्ट ङ्गइस्रोफने ठेवले होते; परंतु करोना साथरोगासह अन्य कारणांमुळे ते साध्य करण्यात यश आले नाही. आता त्यासाठी २०२७चे लक्ष्य ठेवण्यात आले असून, त्यासाठीची तयारी पुढील वर्षापासून सुरू होईल. शुभांशू शुक्ला यांचा समावेश असलेल्या ङ्गऑक्सिआम ४फया सध्याच्या मोहिमेचा भारताला उपयोग होऊ शकेल. मानवी अवकाश मोहीम राबविण्यासाठीचे अनेक धडे यातून मिळतील. ऑक्सिऑम ४ मोहिमेला ङ्गइस्रोफने अर्थसाह्य करण्याचा एक हेतू हाही आहे. अमेरिका, भारत, पोलंड आणि हंगेरी या चार देशांचे अंतराळवीर या मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात चौदा दिवस राहणार असून त्या काळात साठ वेगवेगळे प्रयोग होणार आहेत. भारतासह तीस देशांकडून हे प्रयोग होतील. सूक्ष्मगुरुत्वाकर्षणात बियाण्यांचा वापर, बीजांकुर, प्रतिकूल तापमानातील सूक्ष्मजीवांचे जगणे, नील-हरित जीवाणू, अंतराळातील सूक्ष्म शैवाल आदी भारताकडून होणाऱ्या प्रयोगांची निष्पत्ती ही भविष्यातील अंतराळ मोहिमांसाठी उपयुक्त ठरेल. अवकाश विज्ञान समजून घेण्यासाठीही ते महत्त्वाचे असणार आहे. अंतराळात राहण्यासाठीची क्षमता विकसित करण्यापासून तेथील जैवविज्ञान प्रयोगांसाठी संधी निर्माण करण्यापर्यंतची उद्दिष्टे ङ्गगगनयानफ मोहिमेने समोर ठेवली आहेत. शुक्ला यांच्यासह प्रशांत बालकृष्णन नायर, अजित कृष्णन, अंगद प्रताप हे ङ्गगगनयानफ मध्ये सहभागी होतील. शुक्ला यांचा सध्याच्या मोहिमेतील अनुभव ङ्गगगनयानफच्या वेळी उपयुक्त ठरेल. २०३० पर्यंत अवकाश स्थानक विकसित करण्याचेही भारताचे उद्दिष्ट आहे. त्याच्या पूर्ततेसाठीही सध्याची मोहीम महत्त्वाची ठरेल. शुक्ला यांच्या अवकाश झेपेशी या सर्व गोष्टी अशा रीतीने जोडल्या गेल्या आहेत. अवकाश तंत्रज्ञानाला आलेले सामरिक स्वरूपही याबाबत महत्त्वाचे ठरते. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि तत्कालीन सोव्हिएत रशिया यांच्यात अवकाश तंत्रज्ञानाची स्पर्धा होती. कालांतराने ती कमी झाली असली, तरी संपली नाही

# बीड अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी एस आय टी चौकशीची धनंजय मुंडे यांची मागणी

## अशा नीच नराधमांना व त्यांना मदत करणाऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, यासाठी प्रयत्न करणार - धनंजय मुंडे

बीड दि.२९ (प्रतिनिधी): बीडच्या उमाकिरण शैक्षणिक संकुलात घडलेला प्रकार दुर्दैवी व संतापजनक आहे. यातील आरोपी विजय पवारला राजकीय बळ आहे, बीडचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या आश्रयाने व वरदहस्ताने या लोकांची इथपर्यंत मजल गेली आहे. या प्रकरणी व्यवस्थित तपास होऊन याधीही असे गुन्हे या लोकांनी केले आहेत का, याची सविस्तर चौकशी होणे अपेक्षित आहे, म्हणून आपण या प्रकरणी एस आय टी चौकशीची राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे मागणी करणार असल्याचे माजी मंत्री, आमदार धनंजय मुंडे यांनी आज बीड येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे.

हा प्रकार गेल्या वर्षभरापासून सुरू होता, त्या अल्पवयीन भगिनी ने जी अत्याचार सहन केला, त्याची पीडा ती स्वतः व तिचे पालकच समजू शकतात.

मात्र या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतरही आरोपी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या सोबत होते, अशी माहिती मिळाली आहे. त्यांचे संबंध नेमके कशाचे आहेत? हे संबंध आर्थिक आहेत की आणखी काही असा



घणाघात आ.धनंजय मुंडे यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची महिला आयपीएस अधिकर्यामार्फत एसआयटी नेमून चौकशी केली जावी असेही आ.धनंजय मुंडे म्हणाले. बीडच्या उमाकिरण शैक्षणिक संकुलात घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर आ.धनंजय मुंडे यांनी रविवारी माध्यमांशी संवाद साधला. उमाकिरण मध्ये एक प्रकार समोर आलाय मात्र अशा अनेक घटना घडलेल्या असाव्यात असा संशय असल्याचे आ.मुंडे म्हणाले. कमी शुल्काचे आमिश दाखवून विद्यार्थ्यांना वाममार्गाला लावण्याचा प्रकार विजय पवार व त्याच्या सहकार्याच्या माध्यम ातून होत होता असा दावाही आ.धनंजय मुंडे यांनी केला आहे.

आरोपी विजय पवार, प्रशांत खटोकर यांना हे सर्व करता आले त्यामागे त्याला राजकीय आश्रय होता. गुन्हा दाखल झाला त्या दिवसाचे दोन आरोपी आणि त्या पाठबळ देणार्यांचे सीडीआर काढावेत असे आव्हान देखील आ.धनंजय मुंडे यांनी पोलीस प्रशासनाला दिले. पोलीस ज्या पद्धतीने हा तपास करत आहेत त्या पद्धतीने आरोपीला शिक्षा होईल असे वाटत नाही त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी महिला आयपीएस अधिकर्यामार्फत एसआयटी गठीत करून व्हावी अशी मागणी आपण मुख्यमंत्र्यांकडे व दोन्हीही उपमुख्यमंत्र्यांकडे करणार आहोत असेही आ.मुंडे म्हणाले.

तत्पूर्वी मुंडे यांनी पोलीस अधीक्षक नवनीत तसेच या प्रकरणात नियुक्त तपास अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून चर्चा करून सुरू असलेल्या तपासाची चौकशी केली.

अशा नीच वृत्तीच्या लोकांनी असे किती गुन्हे याआधी केलेत तेही उघड होऊन यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, तसेच खाजगी कोचिंग क्लासेस चालकांना फी वसुली सह सुरक्षेच्या दृष्टीने शासनाकडून एक संहिता लागू असावी, याबाबत आपण प्रयत्न करणार असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, फारुक पटेल, अॅड. गोविंद फड, दादासाहेब मुंडे, भागवत तावरे, यांसह याप्रकरणी आंदोलन पुकारलेले पालक व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

### केंद्र सरकारला वक्फ सुधारणा कायदा मागे घ्यायला भाग पाडू - खालिद सैफुल्लाह रहेमानी

# बीडमधील वक्फ बिलाविरुद्ध जन निषेध सभेला मोठी गर्दी

### ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे अध्यक्ष, सचिव, प्रवक्त्यांसह देशभरातील धर्मगुरूंची उपस्थिती

बीड ( प्रतिनिधी ) ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाच्या वतीने वक्फ सुधारणा कायद्याविरुद्ध देशभरात लढा उभारण्यात आला आहे. या मोहिमेविरुद्ध आपण सर्वजण उभे आहोत ही लढाई अतिशय महत्त्वाची असून यामध्ये सर्वांची एकजुट आवश्यक आहे. त्यासाठी एकजुटीची दोर आणखी मजबूत करा आणि याच एकजुटीच्या बळावर केंद्र सरकारला वक्फ सुधारणा विधेयक मागे घ्यायला भाग पाडू असा विश्वास ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे अध्यक्ष हजरत खालिद सैफुल्लाह सहाब रहमानी यांनी व्यक्त केला.

बीड शहरातील मोमीनपुरा बायपास येथील इज्तेमागाह मैदानावर रविवारी आयोजित वक्फ सुधारणा विधेयक सुधारणा कायद्याविरुद्ध जन निषेध सभेत ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे अध्यक्ष हजरत सैफुल्लाह बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ऑल इंडिया म ुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे सचिव मौलाना मोहम्मद उमरेन महफुज सहाब रहमानी राष्ट्रीय प्रवक्ते कासिम रसूल इलियास साहब, मुफ्ती मोइजोद्दीन कासमी, मौलाना रफीउद्दिन अशरफी, मौलाना अब्दुल मुजीब साहब यांच्यासह बीड येथील वक्फ बचाव कमिटी व मजलिस उलेमा आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलतांना हजरत सैफुल्लाह सहाब म्हणाले की, मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने वक्फ सुधारणा कायद्याविरुद्ध लढा सर्वांच्या एकजुटीने उभारण्यात आलेला आहे. देशभरात याबद्दल लोकशाही मार्गाने व्यापक आंदोलन उभारण्यात आलेले आहे. हा लढा शेवटपर्यंत लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. मौलाना मोहम्मद उमरेन महफुज रहमानी म्हणाले की, आपली लढाई ही काळ्या कायद्याविरुद्ध आहे. काळा कायदा वापस घेतला जात नाही तोपर्यंत हा लढा सुरूच राहणार आहे. आम्ही कोणाच्या विरोधात किंवा कोणत्याही धर्माच्या विरोधात बोलत नाहीत तर हक्कासाठी बोलत आहोत. या लढ्यात फक्त मुस्लिम समाजच नाही तर इतर समाजही सहभागी आहे. आपली



ताकद कमजोर पडू देऊ नका. एकजुकीने प्रयत्न करू आणि हा लढा यशस्वी करू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डाचे प्रवक्ते डॉ. कासीम रसुल इलियास म्हणाले की, केंद्र सरकारने आणलेले वक्फ विधेयक दुरूस्ती कायदा वक्फच्या फायद्यासाठी आणलेला नसून केवळ वक्फच्या प्रॉपर्टीजमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी आणलेला आहे. प्रॉपर्टी हडपण्यासाठी आणलेला आहे असा आरोप त्यांनी केला. या प्रकरणात सध्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. सदरील कायद्यासंदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट असतांना केंद्र सरकारने वक्फ पोर्टलच्या माध्यमातून सर्व वक्फ प्रॉपर्टीज रजिस्टर्ड करा असे आवाहन करणे योग्य नाही. ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाच्या वतीने सर्व मुस्लीम समाजाला संदेश देण्यात आला असून जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय येत नाही तोपर्यंत वक्फ पोर्टलवर कोणतीही प्रॉपर्टी रजिस्टर्ड करू नका. आम्ही हे दुरूस्ती विधेयक पुर्णपणे रिजेक्ट करत आहोत असे त्यांनी सांगितले. निषेध सभेचा सम ारोप सामूहिक दुवाने करण्यात आला. या सभेसाठी जिल्हाभरातील मुस्लिम समाज बांधव हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते.

# पत्रकारांनी सकारात्मक पत्रकारितेतून सर्व सामान्यांचे प्रश्न सोडवावे-जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे

## जिल्हा निर्मिती साठी किनवट पत्रकारांच्या शिष्टमंडळासह मुख्यमंत्र्यांना भेटणार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : पत्रकारांनी सामाजिक बांधिलकीतून वार्तांकन करून सकारात्म क पत्रकारितेतून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी व सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी न्याय्य भूमिका बजवावी, असे प्रतिपादन मराठी पत्रकार परिषदेचे नांदेड जिल्हाध्यक्ष संतोष पांडगळे यांनी केले. किनवट तालुका पत्रकार संघटनेच्या कार्यकारणीच्या वर्षपूर्ती सोहळ्यात जिल्हा कार्यकारणीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार व मराठी पत्रकार परिषद शाखा किनवटच्या अधिकृत सदस्यांना ओळखपत्राचे वाटप असा कार्यक्रम दिनांक २९ -जून रोजी गोकुंदा येथील विसावा गार्डन येथे निसर्गरम्य वातावरणात पार पडला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड जिल्हाध्यक्ष संतोष पांडगळे यांची तर प्रमुख पाहुणे म्हणून मंचावर सरचिटणीस अनुराग पावळे,डिजिटल मिडियाचे जिल्हाध्यक्ष मुजीब शेख, राज्य कार्यकारणी सदस्य सरफराज दोसानी संघटनेचे नवनियुक्त जिल्हा उपाध्यक्ष सुनील श्रीमनवार, जिल्हा संघटक प्रदीप वाकोडीकर सहसचिव राज ठाकूर,कार्यकारणी सदस्य जयकुमार अडकिने,फुलाजी गरड,गंगाराम गड्डम वार,मा.नगराध्यक्ष आनंद मच्छेवार,माजी नगराध्यक्ष के.मूर्ती भाजपचे तालुकाध्यक्ष उमाकांत र्‍हाळे शहराध्यक्ष स्वागत आयनेनीवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

मराठी पत्रकार परिषद किनवट शाखेचा वर्षपूर्ती व ओळखपत्र वितरन सोहळा



येथील विसावा गार्डन येथे आयोजीत करण्यात आला यावेळी पुढे बोलताना जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे म्हणाले की नांदेड पासून किनवट चा शेवटचा भाग २०० किमी पर्यंत लांब असल्याने नागरिकांची होणारी परवड थांबविण्यासाठी किनवट जिल्हा निर्मितीची मागील अनेक दिवसाची मागणी आहे,किनवट तालुका पत्रकार संघाने यासाठी रेटा लावलेला आहे.जिल्हा निर्मितीच्या मागणीसाठी किनवट तालुका पत्रकार संघाच्या शिष्टमंडळासह मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन पाठपुरावा केला जाईल असा विश्वास त्यांनी उपस्थित पत्रकारांना दिला.यावेळी बोलतांना मा.नगराध्यक्ष आनंद मच्छेवार म्हणाले आमच्या राजकीय जडघडनीत पत्रकाराचे मोठे योगदान असून आम्ही कांही चुकलोतर ते निदर्शनास आनुन दिल्याने पुढचे पाउल सावध टाकण्यासाठी आम्हाला सहकार्य होते.तर यावेळी अनुराग पावळे, मुजीब भाई शेख,सरफराज दोसानी,प्रदीप वाकोडीकर,सुनील श्रीम नवार,इश्वर जाधव,अॅड सूर्यवंशी यांची समयोचित भाषणे झाली.प्रास्ताविक संघटनेचे सचिव बालाजी सिरसाट यांनी तर आभार तालुकाध्यक्ष प्रमोद पोहरकर यांनी मानले,उत्कृष्ट संचलन बापूसाहेब तुप्पेकर यांनी केले.या कार्यक्रमा दरम्यान आमदार भीमराव केराम यांचे प्रतिनिधी म्हणून माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांनी उपस्थित मान्यवरचा सत्कार करून लेखणी भेट दिली. यावेळी पत्रकारसंघाचे कार्याध्यक्ष,किरण ठाकरे, त्र्यंबक पुनवटकर,कचरु जोशी,म ारोती शेळके, गौतम कांबळे, प्रकाश कार्ले वाड भोजराज देशमुख, शिवाजी काळे,बबन वानखेडे,प्रवीण शेख,विजय जोशी गौतम येरेकार, दिलीप राठोड, वैशपाल कांबळे ,विनोद डवले सुधाकर कदम ,नितीन राठोड आनंद सोनटक्के ,अॅड.शाम जाधव ,माधव सुर्यवंशी यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी सदस्य यांची उपस्थिती होती.

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःशहुल मारोतीराव वाईकर

सोमवार ३० जून २०२५
https://lokaarambh.com


## प्रा.नरेश शिंदे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित...




प्रतिनिधी अंबड बी.द.चेंज फाऊंडेशन शिर्डी यांच्या वतीने रविवारी (दि-२९) रोजी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ चे वितरण शिर्डी येथे करण्यात आले.यात अंबड तालुक्यातील रोहिलागड येथील रहिवासी तथा भांबेरी येथील अडभगंनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रा.नरेश सखाराम शिंदे यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले अथक प्रयत्न आणि शैक्षणिक व सहशालेय कार्यातील आदर्श सेवेसाठी त्यांची निष्ठा, समर्पण भावना आणि परिश्रम ही अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरलेल्या शिक्षकांना हा पुरस्कार देण्यात येतो. या कार्यक्रमास पद्मश्री डॉ.पोपटराव पवार, ओमप्रकाश कोवटे,भरत दाते आदींच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.प्रा.शिंदे यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# ना.पंकजाताई मुंडे यांच्या स्वप्नातील ग्रीन परळीसाठी महिला सरसावल्या

परळी–प्रतिनिधी हरित परळी,सु ंदर परळी हा उद्देश समोर ठेवत पर्यावरण व पशुसंवर्धनमंत्री ना.पंकजाताई मु ंडे व माजी खा.प्रीतमताई मु ंडे यांच्या स्वप्नातील ग्रीन परळीचे स्वप्न साकार करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली परळी शहरात वृक्ष लागवडीची मोहिम राबविण्यात येत असुन या मोहिमेत महिलांचा लक्षणीय सहभाग आहे. ना.पंकजाताई मु ंड े व खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरण रक्षणासाठी वैद्यनाथ मंदिराच्या पाठीमागे वेताळ मंदिराच्या जवळील मेरुगिरी प्रदक्षिणा मार्गाच्या बाजुने गुरुवार दि.२६ जुन रोजी वृक्षारोपण करण्यात आल्यानंतर शुक्रवार दि.२७ जुन रोजी परळी शहरातील विविध रस्त्यावर वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी राणी लक्ष्मीबाई टॉवर परिसरात महिलांनी वृक्ष दिंडी काढत वृक्ष लागवडीचा संदेश दिला.या मोहिमेत वेगवेगळ्या जातीच्या ४,५०० वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्षलागवड मोहिमेत भाजपाचे डॉ.शालिनीताई कराड,राजेंद्र ओझा, महादेव इटके,बंडू नाना कोरे, दिलीप




नेहरकर,रमेश गायकवाड, विकास हलगे, श्रीनिवास राऊत, बाळू फुले, शिवाजीराव ठोंबरे,चंदाताई ठोंबरे, नंदा पुरभूज, सारिका कुरील, श्रीमती तारामती अग्रवाल,सौ सुरेखा मंत्री, विजयाताई दहिवाळ, चित्राताई देशपांडे,सुनिताताई बोडके, वैशालीताई चिद्रेवार,सौ मंगल देवशेटवार,सुलभा रुद्रवार, अर्चना रुद्रवार,सुरेखाताई मंत्री,सुनंदा निर्मळे,स्वातीताई चाटे, कीर्तीताई झंवर,मनीषाताई चौंडे, अंजूताई ओपळे,छायाताई ओपळे, तसेच परळी शहरातील प्रसिद्ध डॉक्टर सौ. वैशाली गंजेवार, डॉक्टर प्रज्ञा मु ंडे

## आदिवासी बांधवांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप.




प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे उरण दि २९ श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्था व शिवराज युवा प्रतिष्ठान उरण यांच्या संयुक्त विद्यमानाने उरण तालुक्यातील आदिवासी कातकरी पिरवाडी येथे जीवनावश्यक वस्तूचे वाटप करण्यात आले.तसेच महिला व लहान मुलांचे चेकअप देखील करण्यात आले व मोफत औषधे वाटण्यात आली. ३८ जणांनी वैद्यकीय तपासणी चा लाभ घेतला.शिवराज युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष संदेश भाई ठाकूर,समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था कार्याध्यक्ष संगीता ढेरे( रायगड भूषण ) कविता म्हात्रे ,पूजा प्रसादे, मीना रावल, विशाखा म्हात्रे,अनघा ठाकूर, रश्मी तांबे, सीमा निकम, सुमन ताई तोगरे, तृप्ती भोईर, श्रेया ठाकूर, योगेश म्हात्रे, उमेश वैवडे, सचिन ढेरे,केशव निकम, दिनेश हळदणकर,अमर ठाकूर, आनंद ठक्कर ,घनश्याम भोईर, सुभाष पाटील, संग्रामकाका तोगरे, दीपक प्रसादे या सर्वांचे सहकार्य या उपक्रमाला लाभले आहे.श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्था व शिवराज युवा प्रतिष्ठान उरण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या उपक्रमाला जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला असून या कार्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# अरेबियन ज्वेलर्सचा मालक महेबूब मलिकचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर–ॲड.शेख इमरान खाजा

बीड–प्रतिनिधी फ्लॅट, दोन चाकी, चार चाकी वाहन असे आमिष दाखवून लकी ड्रॉ च्या नावाखाली बीडमध्ये सर्वसामान्य नागरिकांना लुटणार्या अरेबियन ज्वेलर्सचा मालक महेबूब मलिक यास लाखोंची फसवणूक केल्या प्रकरणी अटकपुर्व जामीन नामंजूर करण्यात आला आहे. याबाबत माहिती अशी की, बीडमध्ये अरेबियन ज्वेलर्स या नावाने सोन्याची दुकान आहे व त्यास महबूब मलिक हा नावाचा व्यक्ती चालवतो. त्याने बीड येथे दुकान चालवत असताना सोन्याची व गाडीची लकी ड्रॉ स्कीम चालवली व बीड शहरातील अनेक सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या मोठ्या बक्षिसांचे अमित दाखवून लकी ड्रॉ च्या नावाखाली अरेबियन ज्वेलर्स च्या मालकाने कोट्यावधी रुपये उकळले. व त्यानंतर मागील दोन महिन्यापासून त्याच्या दुकानाचे शटर बंद आहे. शहरातील एक ज्वेलर्स दुकानातून अरेबियन ज्वेलर्स चा मालकाने दिनांक २९. ५. २०२४ रोजी २३ लाख रुपये किमतीचे सोने ग्राहकाला दाखवण्यासाठी नेले याविषयी तक्रारदाराने वारंवार पैसे द्या किंवा सोने परत करा अशी मागणी आरोपीला केली परंतु त्यावेळी त्याने उडवा उडवी चे उत्तरे देऊन फसवणूक केली अशी तक्रार ज्वेलर्स मालकान े(तक्रारदाराने) पोलिसात दिले या प्रकरणी महेबूब मलिक याच्याविरुद्ध कलम ४२०, ४०६ भादवी प्रमाणे शहर पोलीस स्टेशन ला गुन्हा क्र.९३/२०२५ नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्यात आरोपी अरेबियन ज्वेलर्स चा मालक महबूब मलिक याने मा. सत्र न्यायालय, बीड येथे अटकपूर्व जामीन मिळणे कामे अर्ज दाखल केला होता सदर जामीन अर्जात ड.शेख इमरान खाजा इमरान खाजा यांनी आक्षेप घेत न्यायालयासमोर आरोपीने लाखों रुपयांची सर्वसामान्य लोकांची फसवणूक के लेली असल्याबाबत कागदपत्र दाखल करत माननीय न्यायालयाचे निदर्शनास आणून दिले व आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली या कायदेशीर बाबी ग्राह्य धरून माननीय न्यायालयाने आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केला. यावेळी आक्षेप अर्जदार यांचे वतीने ॲड .शेख इमरान खाजा यांनी न्यायालयीन बाजू मांडली. त्यांना ॲड.पंकज रायबोळे, ॲड.सूर्यकांत पवार, ॲड.शेख अनवर यांनी सहकार्य केले

## योग दिंडी आपल्या दारी अभियानाची सुरुवात

बीड–प्रतिनिधी जागतिक योग दिनानिमित्त बीड शहरातील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयात ङ्मयोग दिंडी आपल्या दारीफ या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. काकू नाना प्रतिष्ठान, पतंजली योग समिती (बीड), सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय व रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाउन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला. संपूर्ण वर्षभर राबवण्यात आलेले ङ्मयोग दिंडी आपल्या दारीफ अभियान पुन्हा सुरू ठेवण्यात येणार आहे. जागतिक योग दिनाचे औचित्य साधून पुढील वर्षभरासाठी या अभियानाची नवीन सुरुवातही करण्यात आली. उपस्थितांनी योग साधना करत जागतिक योग दिनाचे महत्त्व अधोरेखित केले, नागरिकांना नियमित योगाभ्यासासाठी प्रेरित केले. याप्रसंगी काकू–नाना प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड.कालिदास ठिगळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल, ॲड.श्रीराम लाखे, नितीन गोपान, हरीश मोटवाणी, डॉ.निलेश जगदाळे, प्रा.राजेंद्र गाडेकर, रत्नाकर कुलकर्णी, विलास घोडके, विकास गवते, बाबासाहेब कुडके, पुरुषोत्तम एडके, हेमाताई विभुते, अनिता वजुरकर यांच्यासह योग शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मिसाळ सर,मोरे सर,जामकर सर,जायभाये सर,भांगे सर,कराड सर,मोराळे मॅडम,मस्के सर,सोनवणे सर,ढास सर,शिवाजी खेडकर,अंबादास ढोबळे,पवार भारत,इत्यादींनी परीश्रम घेतले.



## पाचोड येथे केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांचे उत्स्फूर्त स्वागत



पाचोड (प्रतिनिधी) – केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदासजी आठवले यांचे पाचोड येथे आगमन झाले असता त्यांचे फुलांचा हार व जोरदार घोषणांनी उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. स्थानिक नागरिक, कार्यकर्ते व सामाजिक संस्थांनी या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. या प्रसंगी रामदास आठवले यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधत सामाजिक न्याय मंत्रालयाच्या विविध योजनांची माहिती दिली. त्यांनी समाजाच्या सर्व थरांपर्यंत विकासाचे फायदे पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमात विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी आठवले साहेबांच्या विचारांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# उमाकिरण शैक्षणिक संकुलामध्ये घडलेल्या घटनेचा जाहीर निषेध–गीतांजली डोरले

बीड–प्रतिनिधी शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुलामध्ये घटलेल्या घटनेचा शिवसंग्रामच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत आहे. खाजगी कोचिंग क्लासेसना शाळा –महाविद्यालयीन नियमावली लागू करण्यात यावी तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे बंधनकारक करण्यात यावे अशी मागणी शिवसंग्रामच्या बीड जिल्हा युवती अध्यक्षा गीतांजलीताई डोरले यांनी केली आहे. बीड शहरातील नामांकित उमाकिरण शैक्षणिक संकुलामध्ये विद्यार्थिनी संदर्भात गैरवर्तन घडल्याचा प्रकार नुकताच समोर आला आहे.



क्लासेस चालवणारे प्रमुख तथा तेथील प्राध्यापकावर गंभीर आरोप करण्यात येत आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाने क्लासेसच्या संदर्भात एक नियमावली तयार करून ती अंमलात आणणे गरजेचे आहे . शालेय शिक्षण विभाग, जिल्हा प्रशासन, तसेच शिक्षणाधिकारी, संचालक,पालक यांनी एकत्रित येत मंथन करून नियमावली बनविणे व ती अंमलात आणणे अत्यंत निकडीचे ठरले आहे . नुकताच बीड शहरामध्ये उमाकिरण संकुलामध्ये घडलेला प्रकार अत्यंत त्यांच्यावर बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस स्टेशन मध्ये पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे . अशा प्रकरणाला आळा बसवण्यासाठी आरोपींची कसून चौकशी करून कडक शिक्षा झाली पाहिजे जेणेकरून अशा पवित्र क्षेत्रांमध्ये अशा घटना घडू नयेत . दुर्दैवी असून या संदर्भात संबंधितावर कडक कारवाई करण्यात यावी तसेच खाजगी क्लासेस मध्ये सीसीटीव्ही बसवण्याची सक्ती करावी अशी मागणी शिवसंग्रामच्या बीड जिल्हा युवती अध्यक्षा गीतांजलीताई डोरले यांनी केली आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आक्रमक!

## आ.बबनराव लोणीकर यांच्या प्रतिमेला मारले जोडे; परळीत तीव्र निदर्शने

परळी वै । प्रतिनिधी भारतीय जनता पक्षाचे माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकरी आणि महिलांविषयी काही दिवसांपूर्वी आक्षेपार्ह विधान केले होते. या पार्श्वभूमीवर परळी वैजनाथ येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आक्रमक झाला. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे व पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्यासह जेष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार दिनांक २८ जून रोजी शहराच्या मध्यवर्ती भागातील राणी लक्ष्मीबाई टॉवर येथे तीव्र निदर्शने करण्यात आली. आ.लोणीकर यांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले तर त्यांनी केलेल्या वक्तव्याचा निषेध नोंदवण्यासाठी प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. भाजपाचे आ.बबनराव लोणीकर यांनी केलेल्या वक्तव्याचा परळी वैजनाथ येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार



पक्षाच्या वतीने तीव्र निषेध नोंदवण्यात आला असून, लोणीकर यांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले. आक्रमक आंदोलकांनी प्रशासनाच्या मार्फत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले असून त्यात म्हटले आहे की, आ.लोणीकर यांनी केलेल्या वक्तव्य आक्षेपार्ह असून शेतकरी व माता –भगिनींचे संसार मी व देशाचे प्रधानमंत्री चालवतात असे बेजबाबदार शब्द वापरले आहेत. जगाचा अन्नदाता असलेला शेतकरी राबराब राबून अन्नधान्य पिकवतो. प्रत्यक्ष शेतातील बियाणांपासून ते फवारणीच्या औषधापर्यंत प्रचंड मोठ्या प्रमाणावर कर आकारणी केली जाते. त्याच्या पिकविलेल्या मालाला हमीभावापेक्षा कमी भाव मिळतो. एकीकडे बळीराजाची अशी पिळवणूक केली जात असताना दुसरीकडे भाजपचे वाचाळवीर नेते असे बेजबाबदार वक्तव्य करून जनतेच्या भावना दाखवत असतील तर ते अपमानजनक असून मुख्यमंत्र्यांनी त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली. पक्षाचे ज्येष्ठ नेते उत्तमराव माने, तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, मुक्ताराम गवळी यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या. आंदोलकांनी दिलेल्या निवेदनावर तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, शहराध्यक्ष जीवनराव देशमुख, जेष्ठ नेते उत्तमराव माने, ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष एच. यु.फड, रामभाऊ राडकर, मुक्ताराम गवळी, फेरोज सय्यद, पांगरीचे राजेभाऊ फड, भिमराव हाके, अनंत तिडके, रमेश ढाकणे, सतीश देशमुख, शिवाजीराव लोमट `, शिवाजीराव नागरगोजे, भगवानराजे कदम, संदीपान काळे, सोमनाथ भोसले, समाधान मुंडे, विलास राठोड, नितीन शिंदे, बाबासाहेब गव्हाणे, शिवाजी शिंदे, माणिक सातपुते, बब्रुवान आघाव, प्रकाश मुंडे, धीरज माने, मेघराज देशमुख, अशोक साळुंखे, माऊली इंगळे, मंगलताई सोळंके, शेख शाहेदा बेगम जानमोहमद यांच्यासह पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार ३० जून २०२५
https://lokaarambh.com





# मनोज जरांगे पाटलांच्या राज्यव्यापी बैठकीने सरकारचा बीपी वाढला

## आंतरवली सराटीतील राज्यव्यापी बैठकीला तुफाण गर्दी

आता आपल्याला रणभूमीत उतरुन लढायचे, मैदान गाजवायचे अन् विजय खेचून आणायचाय. २७ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटी सोडायची अन् २९ ऑगस्टला मुंबई गाठायची. आता मागे हटायचे नाही. विजय मिळवायचा, त्याशिवाय मुंबईतून वापस फिरायचे नाही. आता ही लढाई आरपारची आणि अंतिम असेल, असा इशारा मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील अंतरवाली सराटी येथे झालेल्या राज्यव्यापी बैठकीत दिला.या बैठकीदरम्यान एक मराठा लाख मराठा लढंगे जितेंगे हम सब जरांगे कोण आला रे कोण आला, मराठ्यांचा वाघ आला अशा घोषणाही देण्यात आल्या.आपल्याला प्रत्येक वेळेस नाव ठेवले जायचे. एवढ्या प्रचंड संख्येने तुम्ही जमला, तुमच्यासमोर नतमस्तक होतो. जातीसाठी किती ताकतीने लढावे, हे सर्व देशाला तुम्ही दाखवून दिले. मराठा समाजाची दोन वर्षापासून संघर्षाची लढाई चालू असून, आता आता मराठ्यांनी जिंकायचे म्हणजे जिंकायचे, असा निर्धारही जरांगे पाटलांनी यावेळी केला.राजकीय लोक त्यांच्या पक्षासाठी, निवडणुकीसाठी रात्र दिवस मरमर करतात, मात्र तुमच्यासाठी, तुमच्या लेकरासाठी व तुमच्या जातीसाठी कोणीच मरमर करत नाहीत. कोणत्याही पक्षाचा मराठा असू द्या, त्यांनी आपल्या लेकराच्या अंगावर गुलाल टाकण्यासाठी सज्ज राहा. आता फक्त आठ नऊ टक्केच मराठा आरक्षणामध्ये जायचे राहिला आहेत, हे सरकारलाही माहित आहे, असेही त्यांनी यावेळी म्हटले.

### मराठा आरक्षणासाठीचा लढा निर्णायक वळणावर; मनोज जरांगे पुन्हा मैदानात

मराठा आरक्षणासाठी सरकार हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या तयारीत तर दुसरीकडे, मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणारे मनोज जरांगे पाटील आज आंतरवाली सराटी येथे महत्त्वाची बैठक घेणार आहेत. या बैठकीसाठी बीडमधून असंख्य मराठा बांधव छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून निघाले आहेत. मराठवाडा महाराष्ट्रात सामील होण्यापूर्वी निजामाच्या काळात आरक्षण होतं, आता पुन्हा तेच हक्क मिळाले पाहिजेत अशा घोषणांनी वातावरण दणाणून गेलं. सरकारकडून हैदराबाद गॅझेट लागू करण्याची शक्यता आणि मराठा समाजाची वाढती एकजूट पाहता, आरक्षणाच्या लढ्याला नवे वळण मिळण्याची चिन्हं स्पष्ट होतायत.

# गावठी दारुची चोरटी विक्री

## महिलेविरुध्द शहर पोलीसांची कारवाई

माजलगाव-प्रतिनिधी गोपनिय माहीतीच्या आधारे माजलगांव शहर पोलीसांनी माजलगांव शहरातील जुना बाजार रोड भागात दि २७ राजी सायंकाळी ०७.३० वाजता छापा मारुन तेथे अवैधरित्या गावठी हातभट्टीची चोरटी विक्री करणारी महीला नामे सत्यभामा सुरेश मंडके रा. सय्यदगल्ली माजलगांव हीचे ताब्यातुन गावठी हातभट्टीची तयार ३० लिटर दारु तसेच गावठी दारु तयार करण्यासाठी उपयोगात येणारे २०० लिटर रसायण, तसेच दारु व रसायण ठेवण्यासाठी वापरात असलेले प्लास्टीकचे व लोखंडी ड्रम असा एकुण ३७,०००/ रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन नमुद महलेविरुध्द गु.र.नं. २३७/२०२५ कलम ६५ (ई), (फ) महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, निरव राजगुरु, उपविभागीय पोलीस अधिकारी, गेवराई अति. पदभार उपविभाग माजलगांव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक संदिप



राठोड, पोहेका / किशोर जाधव, पोलीस अंमलदार शिवगणेश मिरकले, महीला पोलीस अंमलदार स्नेहल परदेशी यांनी केली आहे.

# जिल्हा विकासाची दिशा खा.सोनवणे घेणार आढावा

बीड । प्रतिनिधी जिल्ह्यात विविध योजनांतर्गत विकास कामे सुरू असून त्यांचा आढावा घेण्यासाठी दि.३० जून रोजी दुपारी ३ वाजता खा.बजरंग सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली दिशा समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात आयोजित केली आहे. या बैठकीत खा.बजरंग सोनवणे हे विविध विकास कामांना दिशा देण्याचे काम करणार आहेत. जिल्हा विकास समन्वय समिती व सनियंत्रण समिती (दिशा) ची बैठक आयोजीत केलेली आहे. मागील बैठकीत खा.सोनवणे यांनी विविध विकास कामांचा आढावा घेताना विकास कामांना गती देण्याच्या सुचना दिल्या होत्या. यानंतर आता दि.३० रोजी दिशा समितीची बैठक आयोजित केली असून मागील आठ दिवसांपासून जिल्हा प्रशासनातील अधिकारी या बैठकीची तयारी करत आहेत. दरम्यान, खा.बजरंग सोनवणे हे ग्राम पातळीपासून सर्व अनुभव असलेले नेतृत्व असून त्यांचा जिल्हा परिषदेतील योजनांचा दांडगा अनुभव आहे. यामुळे जिल्हा परिषदेतील अधिकारी तो अनुभव पाहता आपल्याकडून काही उणीव राहणार नाही, याची काळजी घेत आहेत. शिवाय आठ दिवसांपासून सर्व माहिती एकत्रित केली जात आहे. दि.३० रोजी दुपारी ३ वाजता या बैठकीला सुरूवात होणार आहे. या बैठकीत सन २०२४-२५ अखेरचा आढावा घेणार आहेत. तर त्याआधी दुपारी १२.३० वाजता जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची, राष्ट्रीय महामार्ग विभागाची तसेच रेल्वे कामांचीही बैठक आयोजीत केली आहे. या बैठकीला अनेक विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.



बीड : समर्थ विद्यालय शिरसमार्ग चे मुख्याध्यापक सुभाष पवळ हे सेवानिवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकेतर संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय डावकर, उपाध्यक्ष शेख मोहसीन, सचिव नामदेव वाघ, अविनाश कळमकर ,उत्तम राठोड, सतीश बहीर, कैलास ढवळे, बाळासाहेब सोळंके आदि.

# केज बस स्थानकांतून एका महीलेचे दोन तोळे सोने गेले चोरी

केज। प्रतिनिधी केजच्या बसस्थानकात चोरीच्या घटनेचे सत्र सुरूच असून बस स्थानकात चोरीचे सत्र कायम थांबत नसून सतत महिलांचे दागिने,पर्स,मोटर सायकल चोरीला जात आहेत तर पोलिसात तक्रार देऊनही चोरीला गेलेल्या वस्तू अद्यापही सापडत नाहीत त्यामुळे प्रवासी व नागरिक त्रस्त झाले आहेत. चोरीला गेलेल्या वस्तू मिळून येत नसल्यामुळे नागरिकांतून नाराजी व्यक्त केली जात आहे. अशातच एका महिला प्रवासी या बसमध्ये चढत असताना गळ्यातील दोन तोळे वजनाचे गंठण चोरीला गेल्याची घटना घडली आहे. दिनांक २७ जून २०२५ रोजी दुपारी १२-३० वा. सुमारास रामकुंवर तुळशीराम तोंडे रा.जीवाचीवाडी ता.केज ही महिला बीडला जाण्यासाठी केज येथील बस स्थानकातून लातूर संभाजीनगर या एसटी बस मध्ये चढत असताना तोंडाला स्कार्फ बांधलेल्या एक अनोळखी महिलेने त्यांच्या गळ्यातील दोन तोळे वजनाचे सोन्याचे गंठण तोडून चोरून नेले असल्याचे प्राथमिक माहिती मिळाली आहे. गेल्या अनेक दिवसापासून केज शहरासह बसस्थानक व आठवडी बाजारामध्ये चोरीचे प्रमाण वाढले आहे. सतत प्रवाशांचे व नागरिकांचे,महिलांचे मोबाईल, सोने,पर्स,मोटर सायकल चोरीला जात आहेत अनेक महिला व नागरिकांनी चोरी झाल्याच्या तक्रारी पोलीस ठाणे केज येथे केलेल्या असताना देखील चोरीला गेलेल्या वस्तू नागरिकांना मिळाल्या नाहीत. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी केज पोलीस ठाणे येथे नागरिकांशी संवाद साधत शांतता कमिटीची बैठक घेतली होती सदर बैठकीमध्ये केज येथील विविध संघटनेचे पदाधिकारी व लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी केज बस स्थानकामध्ये पोलीस चौकी चालू करण्याची मागणी केली होती. सदर मागणीच्या अनुषंगाने बस स्थानकामध्ये पोलीस चौकी चालू करण्यात आली व त्या ठिकाणी दोन पोलीस कर्मचारी हे ठेवण्यात आले आहेत परंतु ड्युटीवर पोलीस कर्मचारी असताना देखील चोरीचे सत्र चालूच आहे. बस स्थानकामध्ये सीसीटीव्ही असताना देखील चोरीला गेलेल्या वस्तू सापडत नाहीत त्यामुळे नागरिकांतून नाराजी व्यक्त केली जात आहे.

# वैद्यकीय प्रगतीचे बीड मॉडेल-आई टेस्ट ट्युब सेंटर मातृत्वाच्या स्वप्नांना देणार नवा श्वास!

बीड । प्रतिनिधी उंबरठ्यावर पावलांची चाहूल यावी, बाळाच्या हास्याने घर गजबजावं, कुशीत कोवळ्या जीवाचा श्वास खेळावा या स्वप्नपूर्तीकरिता किती तरी महिलांची नजरा आस लागून बसलेल्या असतात. पण काळाच्या कठीण वळणावर, निसर्गाच्या अटींवर आणि नियतीच्या परीक्षांवर मात करताना हाच स्वप्नगंध अनेकदा विरून जातो. मग सुरू होते पायपीट मुंबई, पुण्याच्या दाराशी हताश नजरा, थकलेली पावलं, खर्चाच्या ओझ्याने झुकलेली खांदे, आणि मनात खोलवर साठलेला ताण. पण आज या साऱ्या वेदनांना बीडच्या मातीनेच नवा श्वास दिलाय. बीडमधील सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. चंद्रकांत तोंडे यांच्या दूरदृष्टीतून उभं राहिलंय मआई टेस्ट ट्युब बेबी सेंटरफ हे आहे, मराठवाड्यातील पहिले सर्व आधुनिक सुविधा असलेलं मातृत्वाचं मंदिर! या सेंटरमध्ये केवळ यंत्रं नाहीत, गोठवलेल्या स्वप्नांना पुन्हा उमलवणारेबीड जिल्ह्यातील डॉ. तोंडे यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या आई टेस्ट ट्युब बेबी सेंटरमध्ये बीड जिल्ह्यातील डॉ. किशोर शिरपुरकर (श्रध्दा हॉस्पिटल, बीड), डॉ. शिवाजी सानप (सानप हॉस्पिटल, बीड), डॉ. राहुल यंदे (श्री कृपाळू हॉस्पिटल, बीड), डॉ. वैशाली जाधव (जाधव हॉस्पिटल, बोधेगाव), डॉ. आरती हजारी (हजारी हॉस्पिटल, बीड), डॉ. सतिश तांबडे (ओम हॉस्पिटल, बीड), डॉ. हेमा राऊत (योगिता नर्सिंग होम, केज), वैद्यकीय प्रगतीचे बीड मॉडेल डॉ. गणेश कुटे (कुटे हॉस्पिटल, बीड), डॉ. जया





रायमुळे (चिंतामणी हॉस्पिटल, बीड), डॉ. भोसले, डॉ. फड, डॉ. वाघमारे (न्यु लाईफ हॉस्पिटल, बीड), डॉ. प्रताप राख (साईनाथ हॉस्पिटल, पाटोदा), डॉ. गोविंद लेंडगुळे (तिरुपती हॉस्पिटल, गेवराई), डॉ. आत्माराम मुंढे (विठ्ठल हॉस्पिटल, धारुर), डॉ. अनुपम जेथलिया (जेथलिया हॉस्पिटल, बीड), डॉ. जयदत्त घोळवे (हिरकणी हॉस्पिटल, बीड), डॉ. योगेश सानप (ममता हॉस्पिटल, बीड), डॉ. परमेश्वर डोंगरे (सानप मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, बीड), डॉ. मयुरी डक (डक हॉस्पिटल, माजलगाव), डॉ. स्वप्निल ढाकणे (यशश्री हॉस्पिटल, बीड), डॉ. सायस केंद्रे (केंद्रे हॉस्पिटल, कळंब) हे नामांकित वीस अनुभवी स्त्रीरोगतज्ज्ञ एकत्र आले आहेत, हे आईपणाच्या स्वप्नांना अनुभव आणि तंत्रज्ञानाची सांगड घालून प्रत्यक्षात साकार करणार आहेत. इथे उपचारांना फक्त शास्त्रीय चौकट नाही तर इथे आहे मायेचा हात, समजूतदारपणाची ओल आणि भावनांना दिलेला आधार. वैज्ञानिक कौशल्याला माणुसकीची उब लाभली की एखाद्या बाळाच्या रडण्यामध्येही स्वर्ग सापडतो. तेच इथे घडतंय. ही केवळ बीड जिल्ह्याची वैद्यकीय प्रगती नाही तर ही आहे बीडच्या मातीतील मातृत्वाला दिलेली नवी संधी, नवी आशा, नवी कहाणी. जिथे बाळ जन्मतं, तिथे फक्त लेकरं नव्हे तर नवी स्वप्नं जन्माला येतात आणि म्हणूनच, आता बीडकरांसाठी आई होण्याचं स्वप्न परकं उरलं नाही. आई होण्यासाठी दूरवर निघून जाण्याची धावपळ नाही. कारण आता आपल्या बीडमध्येच आहे आई टेस्ट ट्युब बेबी सेंटर म्हणजे एका आईच्या स्वप्नासाठी उभा राहिलेला विश्वासाचा दिवा आहे

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com